# मिरा भाईंदर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग
## प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र. ०६ अंतर्गत वॉर्ड क्रमांक १६ व १७ याठिकाणी राबविण्यात आली "डीप क्लीन ड्राईव्ह" मोहीम**

स्वच्छ भारत अभियान व राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम या संकल्पनेला मुर्त स्वरूप देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार दिनांक १२ जानेवारी २०२४ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शन व सहभागात तसेच अति. आयुक्त अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त संभाजी पानपट्टे व उपायुक्त रवि पवार यांच्या सहभागात शहरात "डीप क्लीन ड्राईव्ह" ही मोहीम राबविण्यात आली आहे. प्रभाग क्र. ०६ वॉर्ड क्रमांक १६ व १७ या ठिकाणी "डीप क्लीन ड्राईव्ह" ही मोहीम राबविण्यात आली आहे.

सिल्वर पार्क, शांती पार्क, पेणकरपाडा (मिरा रोड (पू.)) इत्यादी ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेमध्ये सर्व विभाग प्रमुखांनी व कर्मचा-यांनी प्रत्यक्ष सहभाग नोंदविला. जवळपास ६०० सफाई कर्मचारी आणि उद्यान, अग्निशमन, सार्व. बांधकाम विभागाचे २०० कर्मचारी या मोहिमेत सहभागी झाले. साफसफाई, स्टीकर्स काढणे, प्लास्टिक पिशवी बंदी कारवाई, शौचालय स्वच्छ करणे, पुतळे धुणे, तुटलेली झाकणे दुरुस्ती करणे, शहरातील रस्त्यांची, दुभाजकांची, बस स्टॉपची स्वच्छता अशी विविध स्वच्छतेची कामे सकाळी ७.०० वाजल्यापासून दुपारी २.०० वाजेपर्यंत करण्यात आले. मा. आयुक्त यांनी रस्त्यावरील धूळ स्वच्छतेसाठी त्याचबरोबर स्वच्छतेत लोक सहभाग वाढावा आणि शहर स्वच्छतेची जाणीव शहरातल्या नागरिकांमध्ये व्हावी म्हणून स्वत: पुढाकार घेत अग्निशमन दलातील वाहनाच्या जेट स्प्रे व पाण्याच्या फवाराच्या सहाय्याने रस्ता सफाई मोहीमेत प्रत्यक्ष सहभाग नोंदविला.

सदर "डीप क्लीन ड्राईव्ह" या मोहीमेत शहरातील जबाबदार नागरिकांनी सहभाग नोंदवून महापालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या वतीने करण्यात येत आहे.

Scanned with CamScanner